# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र

महाराष्ट्र

**निकाल पत्रक**

**लोकगीतांतून लोकशाहीचा जागर २०२२ निकाल**

लोकगीतांचा पारंपरिक गोडवा आणि समाजाला आवाहन करण्याची त्यांची ताकद लक्षात घेऊन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे दिनांक २६ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत **'लोकगीतांतून लोकशाहीचा जागर'** स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील विविध भागांतून एकल आणि समूह या दोन गटांतर्गत एकूण ६८ प्रवेशिका आल्या होत्या. त्यांपैकी एकल गटात ३४, तर समूहामध्ये ३४ प्रवेशिका आल्या होत्या. एकल गटांतर्गत स्नेहा मेश्राम (पुणे) यांना प्रथम पारितोषिक, प्रिया माकोडे (यवतमाळ) यांना द्वितीय पारितोषिक, बाळू बनसोडे (सोलापूर) यांना तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. तसेच, समूहांतर्गत ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित शाहीर नानाभाऊ परिहार आणि संच (जालना) यांना प्रथम पारितोषिक, शाहीर शिवाजीराव धर्मा पाटील, खानदेश लोकरंग फाऊंडेशन, नगरदेवळा (जळगाव) यांना द्वितीय पारितोषिक, तर शाहीर विनोद दिगंबर ढगे, दिशा समाज प्रबोधन बहुउद्देशीय संस्था (जळगाव) यांना तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे.

तसेच, एकल आणि समूह या दोन्ही गटांतर्गत एकूण वीस उत्तेजनार्थ पारितोषिके घोषित करण्यात आली आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे :

अ. एकल गट : १. श्रीकांत देवगोंडा मेडशिंगे (कोल्हापूर), २. बालाजी महादेव जाधव (रायगड), ३. विनोद विद्यागर (मुंबई उपनगर), ४. अनंता अर्जुन मिसाळ (बुलढाणा), ५. शंकर नागनाथ कांबळे (सोलापूर), ६. महादेव तुकाराम भालेराव (बीड), ७. शहाजान सरदार मुकेरी (नाशिक), ८. धनश्री दिनेश जोशी (जळगाव), ९. जयश्री उदय पेंडसे (सांगली), १०. शिल्पा निनाद नातू (ठाणे).

आ. समूह गट : १. शाहीर बजरंग शंकर आंबी (सांगली) २. कविता विद्यागर (मुंबई), ३. अविष्कार विकास एडके (उस्मानाबाद) ४. अनुराधा गोपीनाथ कुलकर्णी, स्वरनिनाद ग्रूप, कोयना वसाहत कराड (सातारा), ५. सुरेश शंकर पाटील, आझाद हिंद शाहिरी पार्टी दिंडनेर्ली (कोल्हापूर), ६. प्रकाश गणपती लोहार, लोककला, कला , क्रीडा, सांस्कृतीक बहुउद्देशिय मंडळ (कोल्हापूर), ७. उषा कमलाकर शेजुळे, शाहीर कमलाकर विठ्ठल शेजुळे आणि पार्टी , नवी मुंबई (ठाणे), ८. गणपत ना. तारवे, क्रांती कला मंच ,हातखांबा (रत्नागिरी), ९. शाहीर सुधाकर आरवेल लोक कला पार्टी (मुंबई), १०. शंकर महादेव दवले (कोल्हापूर).

एकल गटातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांच्या विजेत्यांना अनुक्रमे ७ हजार रुपये, ५ हजार रुपये आणि ३ हजार रुपये ; तसेच मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात येईल. उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त दहा विजेत्यांना प्रत्येकी पाचशे रुपये आणि प्रमाणपत्र देण्यात येईल.

समूह गटातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांच्या विजेत्यांना अनुक्रमे २१ हजार रुपये, ११ हजार रुपये आणि ५ हजार रुपये; तसेच मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात येईल. उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त दहा विजेत्यांना प्रत्येकी एक हजार रुपये आणि प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदर स्पर्धेच्या परीक्षणाचे काम संगीत विशारद पुंडलिक कोल्हटकर आणि नृत्य कलावंत डॉ. सान्वी जेठवाणी यांनी पाहिले.

श्रीकांत देशपांडे
अपर मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य